MHPU250027292022

**<u>फौ. कि. अर्ज. क्र. ६०४/२०२२ मधील नि. क्र. १ खालील आदेश</u>**

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांची आई मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक यांच्या मृत्यु तारखेची नोंद ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर यांचेकडे होवून त्याप्रमाणे मृत्यू दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, त्यांची आई मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक हया दिनांक २८/०८/२०११ रोजी मौजे बेलसर, ता. जुन्नर, जि. पुणे येथे मयत झाल्या. अर्जदाराच्या कुटूंबियांच्या अशिक्षितपणामुळे व नजरचुकीमुळे त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर यांच्याकडे करण्याचे राहून गेले. अर्जदाराला त्यांच्या आईच्या मृत्यु दाखल्याची शासकिय व निमशासकिय कामाकरीता आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराने त्यांची आई मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक यांच्या मृत्यु तारखेची नोंद ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर यांच्याकडे करण्यात येवून त्याप्रमाणे मृत्यु दाखला देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

३. ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर यांनी सदर प्रकरणात त्यांचे म्हणणे देवून मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक यांच्या मृत्यूची नोंद त्यांचे दप्तरी नसल्याबाबतचे कळविले.

४. अर्जदाराने आपल्या अर्जाचे समर्थनार्थ स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ०८ नुसार, तसेच साक्षीदार चिंतामण मल्हारी मंडलिक यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ०९ नुसार आणि पांडूरंग कुशाभाउ मंडलिक यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १० नुसार अभिलेखावर दाखल केलेले असून नि.क्र. ११ नुसार पुरावा बंद पुरसीस दाखल केली आहे. अभिलेखावर अर्जदाराने त्यांचे स्वतःचे आधारकार्डची छायांकित प्रत आणि ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी दिलेले मृत्यु नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

५.     अर्जदार यांची आई मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक यांच्या मृत्यु तारखेची नोंद होवून तसे प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत आहे का ? याबाबत दि. ४/११/२०२२ च्या ''दैनिक नवराष्ट्र'' या वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन देण्यात आले. परंतु कोणतीही हरकत या न्यायालयात प्राप्त झाली नाही.

६.     ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर यांनी दिलेल्या दाखल्याचे अवलोकन केले असता मयताच्या मृत्युची नोंद त्यांच्याकडे झाली नसल्याचे दिसुन येते. पुराव्यात दाखल प्रतिज्ञापत्रावरून व कागदपत्रांवरून मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक हया दि. २८/०८/२०११ रोजी मौजे बेलसर, ता. जुन्नर, जि. पुणे येथे मयत झाले असल्याचे दिसून येते. तसेच ''दैनिक नवराष्ट्र'' या वर्तमान पत्रात दिलेल्या जाहीर प्रगटना नंतर कोणीही कोणतीही हरकत घेतलेली नाही. मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक हया मौजे बेलसर, ता. जुन्नर, जि. पुणे येथे राहत होते हे लक्षात घेवून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१.     अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.     ग्रामपंचायत बेलसर, ता. जुन्नर, जि. पुणे यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराची आई मयत रखमाबाई हरिभाउ मंडलिक यांच्या मृत्युची तारीख दि. २८/०८/२०११ ची नोंद संबंधित नोंदवही मध्ये घेवून त्याप्रमाणे अर्जदाराला मृत्यु प्रमाणपत्र विहीत फी आकारून दयावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRATAP VISHNU SAPAKAL
Date: 2023.04.25 17:00:52 +0530

दि. २५/०४/२०२३.          (प्रताप व्ही. सपकाळ)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जुन्नर

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | |
|---|---|
| न्यायालयाचे नांव | : प्रताप व्ही. सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग<br>न्यायदंडाधिकारी, जुन्नर |
| लघुलेखकाचे नांव | : योगेश के. कोटस्थाने |
| निकाल तारीख | : २५/०४/२०२३ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : २५/०४/२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : २५/०४/२०२३ |